# अन्नदान

ऐकवितो कथा कोणी, कुठे कोरडे तत्वज्ञान
उपाशी राहतो रिक्त, ऐकूनी ऐसे विवेचन ॥ १ ॥

कुठे बैसते पंगत, उपोषित सारे जमवून
सोडे संकल्प कोणी, हो कितीकांचे क्षुधाशमन ॥ २ ॥

जाणतो सार अध्यात्म, मज समजे निरूपण
उदरी वैश्वानर भडकता, काय कशाचे प्रयोजन? ॥ ३ ॥

केले अन्नदान काही, संचित करण्या शून्य
कोण येऊनी सेवितो, कैसे कुणाचे प्रारब्ध जाण ॥ ४ ॥

अनेक नित्य पंगतींचे, चाले येथ अन्नदान
मज दात्याची भूमिका, ईश्वरा करवी भाग्यवान ॥ ५ ॥

तिडीक क्षुधेची समान, असो वृद्ध वा लहान
तयांसी दिधला ग्रास, मज किंचित समाधान ॥ ६ ॥

तिष्ठले लोक मार्गी, तगमग उदरी भयाण
घास सेविता पाहिला, नेत्री तृप्त नारायण ॥ ७ ॥

श्री गुरु चरणरज,
सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78